# परिवर्तनाचा वाटसरू

वर्ष २१वे / अंक १७वा / किं. २५ रु. / १ ते १५ जानेवारी २०२२



**संस्थापक संपादक**

अभय कांता*

**संपादक**

प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**

देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**

प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**सहव्यवस्थापक**

प्रकाश वाघमारे



**संपर्क पत्ता**

५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com



**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील

बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru

बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014

Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

क्र
म


**अतिथी संपादकीय**
प्रदीप पुरंदरे ५

**विशेष लेख**
ट्रॉली टाईम्स : आंदोलनाची माध्यमे ७



अभिषेक भोसले

महिला : लिंगभाव व राजकारण १२




जास्वंदी वांबूरकर

**झाडाझडती**
जयंत नारळीकरांना जाहीर नम्र आवाहन २३
दत्तप्रसाद दाभोलकर

**निमित्ताने**
'जय भीम' कोण म्हणतं? २४
प्रवीण घोडेस्वार

**झरोका**
नक्षलवाद व सहकार : काही निरीक्षणे २८
लखनसिंग कटरे

**भाषा–संस्कृती**
एका पालीच्या चुकचुकण्याचं संशोधन ३२
अंबुजा साळगावकर

**अनुवादित कथा**
ऑनलाईन शॉपिंग ३७
मो. निहाल अफरोज अनु. सुकुमार शिदोरे

**पुस्तक परिचय**
हॉटेलविश्वाचं विदारक चित्रण ४२
पी. विठ्ठल

**कविता**
अरुणचंद्र गवळी ४९
राजश्री देशपांडे ५०


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# कोण म्हणतं 'जय भीम' ?

प्रवीण
घोडेस्वार

असलेली महत्वपूर्ण बाब म्हणजे संपूर्ण सिनेमात कुठेही 'जयभीम' या शब्दाचा उच्चार किंवा उल्लेख नाहीये. पण तरीही या सिनेमाला हे नाव का दिलं असावं याची चर्चा वेगवेगळ्या अंगाने करणात येत आहे. अशी चर्चा करणाऱ्यांमध्ये चित्रपट समीक्षक-अभ्यासक-पत्रकार-विचारवंत-सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक-सामाजिक कार्यकर्ते-माध्यम तज्ञ-राजकीय नेते यांचा समावेश आहे. प्रत्येकाने आपापल्या परीने यावर भाष्य करून याबाबत आपली मते मांडली आहेत. काही मराठी वृत्त वाहिन्यांनी यावर चर्चा देखील घडवून आणली आहे. अशा प्रकारचे चित्रपट मराठी आणि हिंदीत का निर्माण होत नाहीत, याचाही उहापोह करण्यात आला आहे. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टी आणि बॉलीवूड तसेच मराठी व इतर प्रादेशिक चित्रपट उद्योग यांची वैशिष्ट्ये देखील या निमित्ताने चर्चेत आली. एकूण सर्वांच्या विचारांचा मतितार्थ असा की , 'जयभीम' हा चित्रपट अनेक अंगांनी वेगळा आहे. क्रांतिकारी आहे असं म्हटलं तरी चालेल. यातून एका प्रखर सामाजिक वास्तवाचे भेदक दर्शन घडवण्यात आलं आहे. चित्रपट रसिकांना अंतर्मुख करणारा असा हा चित्रपट आहे, अशी प्रतिक्रिया प्रेक्षकांनी दिली आहे. के. चंद्रू नावाच्या वकिलाने ( जे पुढे न्यायाधीश झालेत) एका आदिवासी कुटुंबावर झालेल्या अन्यायाविरोधात उभारलेला लढा ही या चित्रपटाची कथा. एका सत्य घटनेवर आधारित या चित्रपटाचे नायक म्हणजे के.चंद्रू. या चित्रपटाच्या निमित्ताने लोकांना पुन्हा एकदा या नायकाचे कर्तृत्व लक्षात आलं. सर्वस्वी वेगळा सिनेमा काढल्याबद्दल निर्माता आणि चित्रपटाचा अभिनेता सूर्या आणि चित्रपटाचे दिग्दर्शक टी.जे. ज्ञानवेल नक्कीच कौतुकास आणि धन्यवादास पात्र आहेत. आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात वंचित-पीडीत-उपेक्षित अशा अभावग्रस्त समाजाने निर्भयपणे उभे राहिले पाहिजे, असा संदेश हा चित्रपट देतो.

महाराष्ट्राल्या जनतेला 'जयभीम' हा शब्द अपरिचित नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दैवत मानणारा पूर्वाश्रमीचा महार आणि १९५६ नंतर बौद्ध धम्म स्वीकारलेल्या समाजाने प्रामुख्याने हा

लेखक नाशिकस्थित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे प्रभारी संचालक आहेत.
ईमेल- gpraveen18feb@gmail.com

आहे, हे देखील यामुळे ध्यानात येत असतं. अलीकडे तर या शब्दाचा उपयोग अमुक एका व्यक्तीची जात महार /बौद्ध आहे हे सांगण्यासाठी देखील केला जातो. ती व्यक्ती 'जयभीम' आहे असं बिनदिक्कतपणे खाजगीत सांगितले जातं. बाबासाहेबांविषयी आदर-कृतज्ञता-भक्तीभाव प्रदर्शित करण्यासाठी या शब्दाचा प्रयोग केला जातो. असं करणे केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयीचा आदर नि भक्ती नाहीये. तर यामागे त्यांनी दिलेला विचार, त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले यश, प्राप्त केलेला सन्मान,आधुनिक भारताच्या उभारणीत दिलेलं अतुलनीय नि अमूल्य योगदान, त्यांचं विस्मयचकीत करणारे बुद्धीवैभव, सबंध देशाला एकसंध ठेवणारे संविधान, भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी उचलेले अहर्निश कष्ट, त्यांनी पाहिलेलं समतामूलक समाजाचे स्वप्न, प्रतिगामी आणि सनातनी समूहाचा विरोध झुगारून सर्व भारतीय स्त्रियांच्या उत्थानासाठी केलेलं कार्य आणि प्रथमतः आणि अंतिमत:ही भारतीय आहे असे ठणकावून सांगणारी जाजवल्य देशभक्ती यास केलेला साष्टांग दंडवत म्हणजे 'जयभीम' असं प्रकर्षाने म्हणावंसं वाटतं.

'जयभीम' या शब्दाचे प्रचलन कसं झालं ते याठिकाणी समजून घेणं अप्रस्तुत होणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. तत्कालीन प्रत्येक प्रांतांमध्ये या पक्षाच्या प्रांतीय शाखा स्थापन करण्यात आल्या.एका प्रांतिक शाखेचे नेते म्हणून बाबू हरदास एल.एन. यांची निवड करण्यात आली. ते १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकीत मध्यप्रांतीय कौन्सिलमध्ये निवडून आले. बाबू यांना भेटायला अनेक संस्थेचे पदाधिकारी-कार्यकर्ते, खूप दिवस सुरू होतं. इतर समाजाप्रमाणे आपल्या अस्पृश्य समाजाला देखील एखादे सर्वसामान्य संबोधन असावे असा विचार त्यांच्या डोक्यात आला.त्यांच्या मनात विचारांचे काहूर निर्माण झालं. काही तरी वेगळं नि बाबासाहेबांना समर्पित असलेलं संबोधन असावं, अशी त्यांची तीव्र इच्छा होती. खूप विचार करून त्यांना 'जयभीम' हा शब्द गवसला. यास्तव बाबू हरदास एल. एन. यांना 'जयभीम' या संबोधनाचे जनक म्हटले जाते.

महाराष्ट्रात दलित समूहात आढळून येणाऱ्या महार या जातीशिवाय दोन प्रमुख जाती म्हणजे चर्मकार आणि मातंग. पैकी चर्मकार हा समाज तुलनेने सधन असून परंपरागत व काहीसा हिंदुत्ववादी विचारांकडे झुकणारा असल्याचे दिसून येतं . परिवर्तनाच्या चळवळीतही हा समाज अभावानेच दिसून येतो. महाराष्ट्रात महार आणि मातंग समाजाच्या तुलनेत अस्पृश्यतेचे चटके देखील या समाजाला कमी प्रमाणात सहन करावे लागले आहेत. अंधश्रद्धा आणि हिंदू धर्माचा प्रचंड पगडा असलेला हा समाज केवळ आरक्षण नि सवलतींसाठीच दलित असतो. एरवी हा समाज हिंदू असल्याचा गर्व नि अभिमान बाळगताना दिसतो. परिणामी या समाजाचे फार कमी लोकं 'जयभीम' या अभिवादनाचा उच्चार करतात, असं म्हणता येईल. महार समाजानंतर 'मातंग' समाज बाबासाहेबांना मानणारा आहे, असं आढळून येतं. या समाजाचे बाबासाहेबांची जयंती - महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमांत सहभागी होण्याचे प्रमाण लक्षणीय असते. त्यामुळे या समाजात 'जयभीम' चा उच्चार करणाऱ्यांचे प्रमाण नक्कीच जास्त आहे, असं म्हणता येऊ शकतं.

अलीकडे अभ्यासामुळे, जाणीव जागृती झाल्यामुळे,

प्रमाण तसे कमी असलं तरी आशादायक आहे. केवळ बहुजन-आदिवासीच नव्हे तर काही ब्राह्मण-मराठा समाजाचे लोकंही जयभीमचा उच्चार न संकोचता करतात. याठिकाणी राजकारणी लोकांचाही (नेते व कार्यकर्ते) उल्लेख करायला हरकत नाही. ही मंडळी प्रामुख्याने जनसभेला संबोधित करताना आणि आंबेडकर जयंती- महापरिनिर्वाण दिन - धम्मचक्र प्रवर्तन दिन निमित्ताने एकत्र आलेल्या जनसमुदायाशी संवाद साधताना जयभीम चा उच्चार करतात. अलीकडेच दिवंगत झालेल्या प्रख्यात समाजशास्त्रज्ञ आणि स्त्रीवादी विचारवंत कमला भसीन ह्या बोलताना नेहमीच इतर संबोधनासमवेतच खूप आदराने आणि जोशात जयभीम शब्द उच्चारायच्या ! महात्मा फुले-शाहू महाराज-बाबासाहेब यांच्या विचारांचे अभ्यासक हरी नरके आणि इतिहासाचे विद्वान प्रोफेसर उमेश बगाडे ही महनीय माणसं फार सहजतेने जयभीम म्हणताना दिसतात. याच पंक्तीत औरंगाबादच्या प्रोफेसर सुधीर गव्हाणे यांचं देखील नाव घेता येतं. ते सुद्धा फार आत्मीयतेने, जयभीम चा उच्चार करतात. सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका अडव्होकेट निशा शिवूरकर यांचा देखील या ठिकाणी आवर्जून उल्लेख करायला हवा. त्या सुद्धा मोकळ्या मनाने जयभीम म्हणतात. बौद्ध धम्माचा स्वीकार केला असल्याने विचारवंत रुपाताई कुलकर्णी (नागपूर) जयभीम आत्मीयतेने नि आदराने म्हणतात. तिच बाब कविवर्य सुरेश भट यांची. त्यांनीही बौद्ध धम्म स्वीकारला होता. सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे हे सुद्धा फार आदराने जयभीम म्हणताना दिसतात. मुंबई विद्यापीठातले आमचे मित्र प्रा. डॉ. नारायण भोसले हे देखील याच मंदियाळीतले. प्रख्यात इतिहास विभागाच्या प्रमुख प्रोफेसर श्रद्धा कुंभोजकर यांचंही नाव यासाठी अग्रक्रमाने घेता येईल. सत्यशोधक चळवळीतले कार्यकर्ते किशोर ढमाले आणि प्रा. प्रतिमा परदेशी, मराठीचे प्राध्यापक नि कार्यकर्ते अशोक राणा, पुण्याच्या सुगावा प्रकाशनाच्या उषाताई वाघ, समाजवादी चळवळीतले कार्यकर्ते शेखर सोनाळकर (जळगाव), औरंगाबादच्या सामाजिक कार्यकर्त्या मंगला खिवंसरा आणि थोर विचारवंत आ.ह. साळुंके हे सारे जयभीम म्हणणारेच! या पैकी अनेक जण स्वतःला त्यांना जन्माने प्राप्त झालेल्या विशिष्ट जातीचे समजत नाही. ते डीकास्ट झालेले असल्याने त्यांची जन्माने प्राप्त झालेली जात गौण ठरते.

माझे जळगाव विद्यापीठातले निवृत्त सहकारी सुनील पाठक देखील अगदी सहजतेने जयभीम म्हणत असतात. यात अजून एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे हे अभिवादन करताना दोन किंवा जास्त व्यक्ती संवाद साधत असतील तर किमान एक व्यक्ती ही दलित असतेच. म्हणजे एक दलित आणि बाकी दलितेतर. दोन दलितेतर व्यक्ती एकमेकांना जयभीम म्हणताहेत असं चित्र माझ्या पाहण्यात आलेलं नाहीये. खरं म्हणजे ज्यांना डॉ. आंबेडकरांविषयी आदर आहे अशा प्रत्येक व्यक्तीने कोणाशीही संवाद साधताना जयभीम म्हणायला हरकत नाही. शिवाय भारतीय स्त्रियांनी सुद्धा हाच कित्ता आवर्जून गिरवायला हवा. मग त्या स्त्रिया कोणत्याही जाती-धर्माच्या असो, त्यांच्यासाठी डॉ. आंबेडकरांनी जे उत्तुंग काम केलं आहे त्याविषयी कृतज्ञता म्हणून त्या असं नक्की केलं पाहिजे, असं मला वाटतं. काही महाविद्यालयीन शिक्षण घेणारे मुस्लीम विद्यार्थी देखील जयभीम म्हणत असल्याचे माझ्या

सुद्धा जयभीम म्हणताना दिसतो. जयभीम हे अभिवादन समताधिष्टीत समाजाच्या निर्मितीचा ध्यास असणाऱ्या प्रत्येकाने मग ती व्यक्ती स्त्री असो वा पुरुष अथवा इतरलिंगी; आदर नि अभिमानाने करायला हवं. धडाडीच्या युवा सामाजिक कार्यकर्त्या नि कवयत्री दिशा शेख या सुद्धा जयभीमचा उच्चार अभिमानाने नि आनंदाने करतात. 'जयभीम' या चित्रपटामुळे हा शब्द

यांचा १२ जानेवारी हा ८३ वा स्मृती दिन. या निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन !

●

(हा लेख लिहिताना माझे जळगाव येथील मित्र आणि इतिहासाचे प्रा. देवेंद्र इंगळे आणि प्रा. अजय अहिर, पुणे यांच्यासमवेत झालेली चर्चा फलदायी ठरली. त्याबद्दल या दोघांचे मनापासून आभार.)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**, औरंगाबाद,
**प्रागतिक इतिहास संस्था**, महाराष्ट्र आणि
**विवेकानंद महाविद्यालय**, औरंगाबाद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राज्यस्तरीय परिसंवाद
दि. ३० व ३१ डिसेंबर २०२१

**जातीअंताचा सिद्धांत आणि व्यवहार**

**रणजित परदेशी–सुधाकर गायकवाड गौरवपर परिसंवाद**

स्थळ : विवेकानंद कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद
वेळ : सकाळी १० ते सायं. ५

संपर्क ध्वनी : ८९९९ ९०८ ०६१, ९४२० ८५२ १९४